लोकसत्ता



# निर्यात १०० अब्ज डॉलरवर नेण्याचे राज्याचे लक्ष्य

देशाच्या पश्चिमेकडील राज्य असलेल्या महाराष्ट्राने निर्यात प्रोत्साहनाच्या ‘एक जिल्हा एक उत्पादन’ योजनेअंतर्गत राज्याच्या ३६ जिल्ह्यांमधून निर्यातयोग्य ११३ उत्पादने निश्चित केली आहेत

Written by लोकसत्ता टीम
March 26, 2022 12:10:00 am



मुंबई : विद्यमान २०२१-२२ आर्थिक वर्षांत देशाने ४०० अब्ज डॉलरच्या निर्यातीचे उद्दिष्ट गाठल्याचे नुकतेच केंद्राकडून घोषित करण्यात आले, यात एक-चतुर्थांश वाटा हा महाराष्ट्राचा असेल आणि राज्यातून १०० अब्ज डॉलपर्यंत निर्यातवाढ चालू वर्षांत गाठली जाईल, असा विश्वास राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी शुक्रवारी येथे व्यक्त केला. एमव्हीआयआरडीसी वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबईद्वारे आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते.

देशाच्या पश्चिमेकडील राज्य असलेल्या महाराष्ट्राने निर्यात प्रोत्साहनाच्या ‘एक जिल्हा एक उत्पादन’ योजनेअंतर्गत राज्याच्या ३६ जिल्ह्यांमधून निर्यातयोग्य ११३ उत्पादने निश्चित केली आहेत, असे नमूद करताना भविष्यात या संभाव्य निर्यातलक्ष्यी उत्पादनांची संख्या १,००० पर्यंत वाढवण्याचा आशावादही त्यांनी व्यक्त केला. राज्याचे विकास आयुक्त (उद्योग) आणि निर्यात आयुक्त डॉ. हर्षदीप कांबळे प्रसंगी उपस्थित होते.